Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक ५]  गुरुवार ते बुधवार, जानेवारी ३०-फेब्रुवारी ५, २०२०/माघ १०-१६, शके १९४१ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४.

**अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) च्या अनुषंगाने कलम २३ (१) नुसार चांदूर बाजार नगर परिषद क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक न.प.चां.बा.-बांध.विभाग-कावि-८९७-२०२०.——

नगर विकास विभागाचे क्रमांक वि.यो-चांदूर बाजार (सु)-टिपी तह-२८९९-४९-प्र.क्र. ३०-९९, नवि-३०, दिनांक १-३-२००० अन्वये चांदूर बाजार शहराची सुधारित विकास योजना मंजूर झाली असून दिनांक २-५-२००० पासून अंमलात आली आहे. शासन आदेशाप्रमाणे सदरची सुधारित विकास योजना ही दिनांक २-५-२००० पासून वीस वर्ष कालावधीकरीता अंमलात राहणार असल्यामुळे दिनांक २०-५-२०२० रोजी संपुष्टात येत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) अन्वये चांदूर बाजार नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) च्या अनुषंगाने कलम २३ (१) अन्वये चांदूर बाजार नगर परिषद विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ३२९, दिनांक १८-१२-२०१९ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) नुसार चांदूर बाजार नगर परिषद विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगर परिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आंत मुख्याधिकारी, चांदूर बाजार नगर परिषद यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

चांदूर बाजार :
दिनांक १८ जानेवारी २०२०.

**रविंद्र गो. पवार,**
अध्यक्ष,
नगर परिषद, चांदूर बाजार.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Declaration of Intention to prepare Development Plan of Chandur Bazar Municipal Council as per Section 23 *(1)* read with Section 21 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. MCCB-Const.D.-WS-897-2020.—

As per Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's Notification No. D.P.-Chandur Bazar (R)-T.P. Tah-2899-49-P.Kr. 30-99-Navi-30, Dated 1-3-2000 Municipal Council, Chandur Bazar sanctioned Development Plan and from dated 2-5-2000 inforce. As per regulation of Government said Development Plan period will be ends on date 20-5-2020. It is necessary to prepare the Development Plan for the area of Municipal Council, Chandur Bazar as per Section 21 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act,1966 for planned development of the said area.

Hence, the Chandur Bazar Municipal Council by it's Resolution No. 329, Dated 18-12-2019 has given consent to declare it's intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 (*1*) read with Section 21 (*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Chandur Bazar is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the Office of the Muncipal Council as required under Section 23(*2*) of the Maharashtra Regional And Town Planning Act, 1966.

Any suggestions/objections of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Chandur Bazar Muncipal Council within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette. The suggestions/objections shall be dully considered while preparing the Development Plan.

Chandur Bazar :
Dated the 18th January 2020.

RAVINDRA G. PAWAR,
President,
Municipal Council,
Chandur Bazar.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६.

## अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याबाबत

### शुद्धीपत्र

क्रमांक मोनप-वियो-सनर-नअ-२२०४-२०२०.——

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची अधिसूचना क्रमांक नपामो-जाक्र-साबां-५४-२०१९, दिनांक १६ एप्रिल २०१९ नुसार महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ अमरावती विभागीय पुरवणी मध्ये दिनांक एप्रिल २५-मे १, २०१९ रोजी पान क्र. १ व २, अ. क्र. ६१ वर प्रसिद्ध झालेली आहे. त्यात खालीलप्रमाणे दुरूस्ती वाचावी.—

**च्या ऐवजी**

**मुद्या क्रमांक ४ :** मंजूर विकास योजनेतील मौजा मोर्शी शेत सर्व्हे नं. ३५/२ अ मधील व्यापारी संकुलाची जागा ०.३२ हेक्टर आर. ही जागा निवासी या प्रयोजनाकरीता दर्शविण्यात यावी.

**असे वाचावे**

**मुद्या क्रमांक ४ :** मंजूर विकास योजनेतील मौजा मोर्शी शेत सर्व्हे नं. ३५/२ अ मधील व्यापारी संकुलाची जागा ०.८१ हेक्टर आर. ही जागा निवासी या प्रयोजनाकरीता दर्शविण्यात यावी.

मोर्शी :
दिनांक २३ जानेवारी २०२०.

**सौ. मेघना मोहन मडघे,**
अध्यक्षा ,
नगर परिषद मोर्शी.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**MODIFICATION UNDER SECTION 37 OF THE MAHARASHSTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.—**

*CORRIGENDUM*

NO. MCM-DP-DTP-TPO-2204-2020.—

The Development Plan of Morshi Town is prepared by Municipal Council, Morshi and Minor modification Under Section 37 of Maharashstra Regional and Town Planning Act 1966 was published by President, Municipal Council, Morshi *vide* letter No. MCM-D-PWD-54-2019, dated the 16th April 2019 in the Maharashstra Government Gazette Part I-A, Amravati Divisional Supplement dated April 25th -May 1st, 2019 on page No. 2 at Serial No. 62. The following correction should be read as follows.—

**For this**

*Point No. 4 :* As per Sanctioned Development Plan, the Proposed Mouza Morshi S. No. 35/2A in Area 0.32 H. A. Commercial Complex should be shown Residential Zone.

**Read As**

*Point No. 4 :* As per Sanctioned Development Plan, the Proposed Mouza Morshi S. No. 35/2A in Area 0.81 H. A. Commercial Complex should be shown as Residential Zone.

Morshi :
Dated the 23rd January 2020.

SAU. MEGHNA MOHAN MADAGHE,
President,
Municipal Council, Morshi.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिद्ध झालेल्या आहेत.**

६

**मंगळवार, जानेवारी २१, २०२०/माघ १, शके १९४१**

भाग १ -अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. १६.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

क्रमांक कक्ष. १९-जिप-पंस-ग्रापंनि-कावि-१०५-२०२०.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९ (१) (ब) व ९ (२) (ब) अन्वये च्या जिल्हा परिषद अध्यक्षाचे नाव व डाकेचा संपूर्ण पत्ता राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत तरतूद आहे आणि,

त्याअर्थी, उक्त महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९ (१) (ब) व ९ (२) (ब) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जितेंद्र पापळकर (भाप्रसे), जिल्हाधिकारी, अकोला याद्वारे दिनांक १७ जानेवारी २०२० रोजी संपन्न झालेल्या अकोला जिल्हा परिषदेच्या विशेष सभेत अडीच वर्षाच्या कालावधीकरीता निवडून आलेले अध्यक्षाचे नांव व पत्ता ते ज्या जिल्हा परिषदेवर निवडून आले त्या जिल्हा परिषदेचे नांव प्रसिद्ध करित आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | अध्यक्ष पदाचे आरक्षण | निवडून आलेल्या अध्यक्षाचे नांव | पक्ष | डाकेचा संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | अकोला जिल्हा परिषद | सर्वसाधारण | प्रतिभा बापूराव भोजने | भारिप बहुजन महासंघ | मु. पो. भांबेरी, ता.तेल्हारा जि. अकोला |

अकोला :
दिनांक १७ जानेवारी २०२०.

**जितेंद्र पापळकर** (भाप्रसे),
जिल्हाधिकारी, अकोला.

भाग १ -अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. १७.

क्रमांक कक्ष. १९-जिप-पंस-ग्रापंनि-कावि-९९-२०२०.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९ (१) (ब)व ९ (२) (ब) अन्वये जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समित्यांचे सभापतींचे नाव व डाकेचा संपूर्ण पत्ता राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत तरतूद आहे आणि,

त्याअर्थी, उक्त महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९ (१) (ब)व ९ (२) (ब) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जितेंद्र पापळकर (भाप्रसे), जिल्हाधिकारी, अकोला याद्वारे दिनांक १६ जानेवारी २०२० रोजी संपन्न झालेल्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या विशेष सभेत अडीच वर्षाच्या कालावधीकरीता निवडून आलेले सभापतीचे नांव व ते ज्या पंचायत समितीवर निवडून आले त्या पंचायत समितीचे नांव प्रसिद्ध करित आहे. तसेच निवडून आलेले सभापती हे अकोला जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्य राहणार आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समितीचे नांव | आरक्षण | निवडून आलेल्या सभापतीचे नांव | पक्ष | डाकेचा संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | पंचायत समिती, तेल्हारा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | खा. रफतसुल्ताना शाहिद खा. | भारिप बहुजन महासंघ | मु. पो. अडगांव बु, ता.तेल्हारा, जि. अकोला |
| २ | पंचायत समिती, अकोट | अनुसूचित जाती महिला | लता शत्रुघ्न नितोने | भारिप बहुजन महासंघ | मु. पो. चंडीकापूर, ता. अकोट, जि. अकोला |
| ३ | पंचायत समिती, मुर्तिजापूर | सर्वसाधारण | उर्मीला बबनराव डाबेराव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | मु.सांजापूर , पो. हिरपूर, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला |
| ४ | पंचायत समिती, अकोला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | वसंतराव मारोती नागे | भारिप बहुजन महासंघ | मु. पो.पैलपाडा, ता. जि. अकोला |
| ५ | पंचायत समिती, बाळापूर | सर्वसाधारण महिला | रुपाली मंगेश गवई | भारिप बहुजन महासंघ | मु. पो.रिधोरा, ता. बाळापूर, जि. अकोला |
| ६ | पंचायत समिती, बार्शिटाकळी | अनुसूचित जाती | प्रकाश वकीलाजी वाहुरवाघ | भारिप बहुजन महासंघ | मु. पो. राहीत, ता.बार्शिटाकळी, जि. अकोला |
| ७ | पंचायत समिती, पातूर | अनुसूचित जमाती | लक्ष्मीबाई जनार्धन डाखोरे | शिवसेना | मु. पो. नवेगाव, पो. चोंढी, ता. पातूर, जि. अकोला |

अकोला :
दिनांक १६ जानेवारी २०२०.

**जितेंद्र पापळकर** (भाप्रसे),
जिल्हाधिकारी, अकोला.

अ.-एक-अ-२ (१७६९).

७

**बुधवार, जानेवारी २२, २०२०/माघ २, शके १९४१**

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १८.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

### आदेश

क्रमांक कक्ष-२०-नविशा-कावि-२१-२०२०.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ-१अ(९) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, संजय पवार, जिल्हाधिकारी, अमरावती या प्रगटनाद्वारे जाहीर करतो की, दिनांक २७ डिसेंबर २०१९ (शुक्रवार) रोजी अध्यक्ष, नगर परिषद, शेंदूरजनाघाट यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेत महाराष्ट्र नगर परिषदा, (उपाध्यक्ष पदाची निवडणूक घेणे) नियम, २००५ मधील तरतुदींनुसार व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ४६६/नवि-१६, दिनांक २१ डिसेंबर २०१६ नुसार खाली अनुसूचिचे स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या नगर परिषदेत त्यांच्या नावासमोर स्तंभ (३) मध्ये नमूद केलेले उमेदवार उपाध्यक्ष म्हणून निवडून आलेले आहेत.

### अनुसूची

| अ. क्र. | नगर परिषदेचे नाव | निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नाव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | शेंदूरजनाघाट | अनिस खॉन शेर खॉन |

अमरावती :
दिनांक १३ जानेवारी २०२०.

**संजय पवार,**
जिल्हाधिकारी, अमरावती.

---

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १९.

## BY COLLECTOR

### *ORDER*

No. Desk-20L-Ele-W.S.-21-2020—

In exercise of the powers under Section 51-A-A1(*9*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* & Industrial Townships Act, 1965. I, Sanjay Pawar, Collector, Amravati hereby published the name of Vice-President of Nagar Parishad, Shendurjanaghat for which the election has been held on dated 27th December 2019 (Friday) as shown below in Schedule Col. No. (3) is elected for the Nagar Parishad shown in Col. No. (2).

### SCHEDULE

| Sr. No. | Name of Municipal Council | Name of Vice-President elected |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Shendurjanaghat | Anis Khan Sher Khan |

Amravati :
Dated the 13th January 2020.

SANJAY PAWAR,
Collector, Amravati.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.